पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
मध्यवर्ती भांडार विभाग
क्र.म.भा./ निविदा / कावि / ९० /२०१४
दि. ०७/१२/ २०१४

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे विविध प्रकारची भांडवली / महसुली कामांसाठी ई-निविदा प्रसिध्द करणेत येतात. निविदा प्रसिध्द केलेनंतर काही कामांकरिता ठेकेदारांनकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यास, संबंधित विभागामार्फत महानगरपालिकेचे प्रचलित पध्दतीप्रमाणे ७ दिवसांच्या दोन मुदतीवाढी देण्यात येतात त्यातही अल्प प्रतिसाद आल्यास तिस-या मुदतवाढी ऐवजी मा. आयुक्तांची मंजूरी घेऊन निविदा उघडण्यात येतात.

परंतु सदरची बाब नियमास धरुन नसलेने व महाराष्ट्र शासनाकडील खरेदी बाबतचे “Manual of office Procedure for Purchases of Stores” यामधील Chapter IV (Part- II) मधील 1(g) नुसार निविदेस ठेकेदारांचा अल्प प्रतिसाद आल्यास १५ दिवसांच्या दोन मुदतवाढी देणे आवश्यक असून, अशा दोन मुदतवाढीनंतर आलेली एक निविदाही उघडण्यास हरकत नसते ही बाब मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी दिनांक १० / ०७ / २०१४ रोजीचे पत्रान्वये निर्देशनास आणून दिलेले आहे.

सबब यापुढे महानगरपालिकेच्या सर्व प्रकारचे महसुली व भांडवली कामांच्या बाबतीत निविदा प्राप्त किंवा स्विकृती करताना ठेकेदारांनकडून निविदे कामी अल्प प्रतिसाद मिळालेस वर नमुद केलल्या Manual मधील Chapter IV (Part- II) या तरतूदीप्रमाणे यापुढे १५ दिवसांच्या दोन मुदतवाढी देण्यात याव्यात. सदर कार्यवाही करणेची संबंधित शाखाधिकारी/विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी व तशा सूचना संबंधितांना देण्यात याव्यात.

(राजीव जाधव)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत :-

सर्व संबंधित विभाग

---------------------

---------------------